भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# उपभोक्ता संरक्षण अधिनियम, १९८६

(१९८६ चा अधिनियम क्रमांक ६८)

[२९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान]

# The Consumer Protection Act, 1986

( Act No. 68 of 1986 )

[ As in force on the 29th May 1992 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९९३
[किंमत : रुपये ३.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान असलेला उपभोक्ता संरक्षण अधिनियम, १९८६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक ३, दिनांक २ जुलै १९९२ यात पृष्ठ १४० ते १४८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २ जुलै १९९२.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the The Consumer Protection Act, 1986 as on the 29th May 1992 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 3, dated 2nd July 1992 on pages 140 to 148.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it becamc the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 2nd July 1992.

K. L. MOHANPURIA,
Secretary to the Government of India.

# उपभोक्ता संरक्षण अधिनियम, १९८६

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

#### प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.
२. व्याख्या.
३. अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याचे न्यूनीकरण करणार नाही.


### प्रकरण दोन

#### उपभोक्ता संरक्षण परिषदा


४. केंद्रीय उपभोक्ता संरक्षण परिषद.
५. केंद्रीय परिषदेच्या बैठकींची कार्यपद्धती.
६. केंद्रीय परिषदेची उद्दिष्टे.
७. राज्य उपभोक्ता संरक्षण परिषदा.
८. राज्य परिषदेची उद्दिष्टे.


### प्रकरण तीन

#### उपभोक्ता विवाद निवारण अभिकरणे


९. उपभोक्ता विवाद निवारण अभिकरणांची स्थापना.
१०. जिल्हा फोरमची घडण.
११. जिल्हा फोरमची अधिकारिता.
१२. फिर्याद करावयाची रीत.
१३. फिर्याद मिळाल्यानंतरची कार्यपद्धती.
१४. जिल्हा फोरमचे निष्कर्ष.
१५. अपिले.
१६. राज्य आयोगाची घडण.
१७. राज्य आयोगाची अधिकारिता.
१८. राज्य आयोगांना लागू असलेली कार्यपद्धती.
१८क अध्यक्षांच्या पदाची रिक्तता.
१९. अपिले.
२०. राष्ट्रीय आयोगाची घडण.
२१. राष्ट्रीय आयोगाची अधिकारिता.
२२. राष्ट्रीय आयोगाला लागू असलेली कार्यपद्धती.
२३ अपिले.
२४. आदेशांची अंतिमता.
२५. फोरम, राज्य आयोग किंवा राष्ट्रीय आयोग यांच्याकडून आदेशांची बजावणी.
२६. क्षुल्लक किंवा त्रासदायक फिर्यादी खारीज करणे.
२७. शास्ती.


### प्रकरण चार

#### संकीर्ण


२८. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.
२९. अडचणी दूर करण्याची शक्ती.
२९क. नियुक्तीतील रिक्तता किंवा दोष यामुळे आदेश विधिग्राह्य न ठरणे.
३०. नियम करण्याची शक्ती.
३१. नियम मांडणे.

# उपभोक्ता संरक्षण अधिनियम, १९८६

**(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक ६८)**

(२९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान) [२४ डिसेंबर १९८६]

उपभोक्त्यांच्या हितसंबंधांचे अधिक चांगले संरक्षण करण्याचा उपबंध करण्यासाठी आणि त्या प्रयोजनार्थ उपभोक्त्यांचे विवाद व त्यांच्याशी संबंधित इतर बाबी मिटवण्यासाठी उपभोक्ता परिषदा व इतर प्राधिकरणे स्थापन करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय प्रजासत्ताकाच्या सदतिसाव्या वर्षी खालीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमास, "उपभोक्ता संरक्षण अधिनियम, १९८६" असे म्हणता येईल.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी व या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

(४) केंद्र शासनाकडून अधिसूचनेद्वारे व्यक्तपणे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, हा अधिनियम सर्व माल व सेवा यांना लागू होईल.

व्याख्या.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "समुचित प्रयोगशाळा" याचा अर्थ, केंद्र शासनाने मान्यता दिलेली प्रयोगशाळा, असा आहे आणि त्यामध्ये, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये कोणत्याही मालात कोणताही दोष आहे किंवा कसे हे निश्चित करण्यासाठी अशा मालाचे विश्लेषण किंवा चाचणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या, केंद्र शासनाद्वारे किंवा एखाद्या राज्य शासनाद्वारे सुस्थितीत ठेवल्या जात असलेल्या, खर्च चालवला जात असलेल्या किंवा अर्थसहाय्यित असलेल्या प्रयोगशाळेचा किंवा संघटनेचा त्यात समावेश आहे.

(ख) "फिर्यादी" याचा अर्थ,—

(एक) एखादा उपभोक्ता; किंवा

(दोन) "कंपनी अधिनियम, १९५६" (१९५६ चा १) किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी करण्यात आलेला कोणताही स्वयंसेवी उपभोक्ता अधिसंघ; किंवा

(तीन) जे फिर्याद करते ते केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन, असा आहे;

(ग) "फिर्याद" याचा अर्थ, फिर्यादीने, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद करण्यात आलेली कोणतीही दाद मिळवण्याच्या दृष्टीने केलेले खालील प्रकारचे कोणतेही लेखी अभिकथन असा आहे :—

(एक) कोणत्याही व्यापाऱ्याने अंगीकारलेल्या कोणत्याही अनुचित व्यापार प्रथांच्या परिणामी फिर्यादीची हानी किंवा नुकसान झाले आहे;

(दोन) फिर्यादीमध्ये उल्लेखिलेल्या मालात एक किंवा अधिक दोष आहेत;

(तीन) फिर्यादीमध्ये उल्लेखिलेल्या सेवांमध्ये कोणत्याही प्रकारचे वैगुण्य आहे;

(चार) फिर्यादीमध्ये उल्लेखिलेल्या वस्तुंसाठी, व्यापाऱ्याने त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे वा तदन्वये निश्चित केलेल्या किंवा मालावर किंवा माल आत असलेल्या कोणत्याही पुडक्यावर दर्शवलेल्या किमतीपेक्षा अधिक किंमत आकारली आहे.

(घ) "उपभोक्ता" याचा अर्थ, पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती, असा आहे :—

(एक) प्रदान करण्यात आलेल्या वा वचन देण्यात आलेल्या अथवा अंशतः प्रदान करण्यात आलेल्या आणि अंशतः वचन देण्यात आलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात अथवा आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही पद्धतीखाली जी कोणताही माल खरेदी करते आणि त्यामध्ये प्रदान करण्यात आलेल्या किंवा वचन देण्यात आलेल्या अथवा अंशतः प्रदान करण्यात आलेल्या वा अंशतः वचन देण्यात आलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात असा माल जिने खरेदी केला असेल त्या व्यक्ती-व्यतिरिक्त अशा मालाचा उपयोग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा किंवा जेव्हा असा उपयोग अशा व्यक्तीच्या मान्यतेने करण्यात येत असेल त्यावेळी आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही पद्धती-खाली अशा मालाची खरेदी करणाऱ्या व्यक्तीचा समावेश आहे. परंतु, जी व्यक्ती असा माल पुनर्विक्रीसाठी किंवा कोणत्याही व्यापारी प्रयोजनासाठी मिळवील तिचा त्यामध्ये समावेश होत नाही; अथवा

(दोन) प्रदान करण्यात आलेल्या किंवा वचन देण्यात आलेल्या अथवा अंशतः प्रदान केलेल्या आणि अंशतः वचन दिलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात अथवा आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही पद्धतीखाली जी, कोणत्याही सेवा भाड्याने घेते ती व्यक्ती आणि त्यामध्ये प्रदान केलेल्या किंवा वचन दिलेल्या अथवा अंशतः प्रदान केलेल्या आणि अंशतः वचन दिलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात जिने, त्या सेवा भाड्याने घेतल्या असतील त्या व्यक्तीव्यतिरिक्त अशा सेवांच्या कोणत्याही लाभाधिकाऱ्याचा किंवा जेव्हा अशा सेवांचा लाभ प्रथमोल्लिखित व्यक्तीच्या मान्यतेने घेण्यात येत असेल त्यावेळी आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही पद्धतीखाली अशा सेवा भाड्याने घेणाऱ्या व्यक्तीचा समावेश आहे;

(ङ) "उपभोक्ता विवाद" याचा अर्थ, जिच्याविरुद्ध फिर्याद करण्यात आली आहे ती व्यक्ती फिर्यादीमध्ये अंतर्भूत असलेली अभिकथने नाकारते किंवा त्याबद्दल विवाद करते त्या बाबतीत तो विवाद, असा आहे;

(च्) "दोष" याचा अर्थ, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये ठेवणे आवश्यक असलेला अथवा कोणत्याही मालाच्या संबंधात व्यापाऱ्याने कोणत्याही रीतीने दावा केलेला दर्जा, परिमाण, शक्ती, शुद्धता किंवा मानक यांतील कोणतीही उणीव, अपूर्णता किंवा कमतरता, असा आहे;

(छ्) "वैगुण्य" याचा अर्थ, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये राखणे आवश्यक असलेला किंवा व्यक्तीने, एखाद्या संविदेच्या अनुषंगाने किंवा अन्यथा कोणत्याही सेवेच्या संदर्भात पार पाडणे पत्करले आहे असा दर्जा, स्वरूप आणि कार्य पार पाडण्याची रीत यांतील कोणतीही उणीव, अपूर्णता, कमतरता किंवा अपर्याप्तता असा आहे;

(ज्) "जिल्हा फोरम" याचा अर्थ, कलम ९ च्या खंड (क्) अन्वये स्थापन करण्यात आलेला उपभोक्ता विवाद निवारण फोरम, असा आहे;

(झ्) "माल" याचा अर्थ, माल विक्रय अधिनियम, १९३० (१९३० चा ३) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला माल, असा आहे;

(ञ्) "निर्माणक" याचा अर्थ, पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती असा आहे :—

(एक) जी कोणताही माल किंवा त्याचे भाग बनवते किंवा निर्माण करते ती; किंवा

(दोन) जी कोणताही माल किंवा त्याचे भाग बनवत किंवा निर्माण करत नाही परंतु जी इतरांनी बनवलेल्या किंवा निर्माण केलेल्या त्याच्या भागांची जुळणी करते आणि अंतिम उत्पादन, आपण स्वतः बनवले किंवा निर्माण केले असल्याचा दावा सांगते ती; किंवा

(तीन) अन्य कोणत्याही निर्माणकाने बनवलेल्या किंवा निर्मिलेल्या कोणत्याही मालावर स्वतःचे चिन्ह घालते किंवा घालण्याची व्यवस्था करते आणि असा माल आपण स्वतः बनवल्याचा किंवा निर्माण केल्याचा दावा सांगते ती.

**स्पष्टीकरण.**—जेथे एखादा निर्माणक, कोणताही माल किंवा त्याचे भाग, त्याने सुस्थितीत ठेवलेल्या कोणत्याही शाखा कार्यालयाकडे पाठवतो तेथे, अशा शाखा कार्यालयांकडे पाठविण्यात आलेले भाग तेथे जुळविण्यात येत असले आणि ते अशा शाखा कार्यालयांतून विकण्यात वा वितरित करण्यात येत असले तरीही असे शाखा कार्यालय निर्माणक मानले जाणार नाही.

(ट्) "राष्ट्रीय आयोग" याचा अर्थ, कलम ९ च्या खंड (ग्) अन्वये स्थापन करण्यात आलेला राष्ट्रीय उपभोक्ता विवाद निवारण आयोग, असा आहे;

(ठ्) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेली अधिसूचना, असा आहे;

(ड्) "व्यक्ती" यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(एक) एखादी पेढी—मग ती नोंदणीकृत असो किंवा नसो;

(दोन) एखादे हिंदू अविभक्त कुटुंब;

(तीन) एखादी सहकारी सोसायटी;

(चार) व्यक्तींचा अन्य प्रत्येक अधिसंघ—मग तो सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) अन्वये नोंदलेला असो किंवा नसो;

(ढ्) "विहित" याचा अर्थ, राज्य शासनाने, किंवा, प्रकरणपरत्वे, केंद्र शासनाने या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(ण्) "सेवा" याचा अर्थ, संभाव्य उपयोगकर्त्याला उपलब्ध करून दिली जाणारी कोणत्याही वर्णनाची सेवा असा असून त्यामध्ये बँकव्यवसाय, खर्च चालवणे, विमा, परिवहन, संस्करण, विद्युत किंवा इतर ऊर्जेचा पुरवठा, भोजन किंवा निवास किंवा दोन्ही, करमणूक, मनोरंजन किंवा एखादी बातमी वा अन्य माहिती पुरविण्याची सोय करणे याचा समावेश आहे, परंतु कोणतीही सेवा विनामूल्य किंवा वैयक्तिक सेवेच्या संविदेखाली करण्याचा त्यात समावेश होत नाही.

(त) "राज्य आयोग" याचा अर्थ, कलम ९ च्या खंड (ख) अन्वये राज्यात स्थापन करण्यात आलेला उपभोक्ता विवाद निवारण आयोग, असा आहे.

(थ) कोणत्याही मालाच्या संबंधात "व्यापारी" याचा अर्थ, कोणताही विक्रेय माल विकणारी किंवा त्याचे वितरण करणारी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये त्याच्या निर्माणकाचा समावेश आहे आणि जेथे असा माल आवेष्टित स्वरूपात विकण्यात किंवा वितरित करण्यात येतो तेथे त्याच्या आवेष्ठकाचा समावेश आहे;

(द) "अनुचित व्यापार प्रथा" या शब्दप्रयोगाला, एकाधिकार आणि निर्बंधित व्यापार प्रथा, अधिनियम, १९६९ (१९६९ चा ५४) याच्या कलम ३६-क मध्ये जो अर्थ आहे तोच अर्थ असेल, परंतु त्या अधिनियमाच्या प्रकरण तीनचा भाग के ज्याला लागू होतो त्या उपक्रमाच्या मालकाने किंवा अशा मालकाच्या वतीने वा त्याच्या लाभार्थ काम पाहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अंगीकारलेल्या अनुचित व्यापार प्रथेचा त्यात समावेश होणार नाही.

(२) हा अधिनियम लागू असेल अशा कोणत्याही क्षेत्रात अंमलात नसलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमाच्या किंवा त्याच्या कोणत्याही उपबंधाच्या या अधिनियमातील निर्देशाचा अर्थ, अशा क्षेत्रात अंमलात असलेल्या तत्सम अधिनियमाचा किंवा त्याच्या उपबंधाचा निर्देश आहे असा लावण्यात येईल.

**अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याचे न्यूनीकरण करणार नाही.**

३. या अधिनियमाचे उपबंध, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या उपबंधामध्ये भर म्हणून असतील व ते त्यांचे न्यूनीकरण करणारे नसतील.

## प्रकरण दोन

### उपभोक्ता संरक्षण परिषदा

**केंद्रीय उपभोक्ता संरक्षण परिषद.**

४. (१) केंद्र शासनाला, अधिसूचनेद्वारे, ते अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून केंद्रीय उपभोक्ता संरक्षण परिषद (यात यापुढे केंद्रीय परिषद म्हणून निर्देशित) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका परिषदेची स्थापना करता येईल.

(२) केंद्रीय परिषदेमध्ये खालील सदस्य असतील, ते असे :—

(क) केंद्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाचा प्रभार असलेला मंत्री, जो तिचा अध्यक्ष असेल; आणि

(ख) विहित करण्यात येतील अशा संख्येतील इतर शासकीय किंवा अशा हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारे अशासकीय सदस्य.

**केंद्रीय परिषदेच्या बैठकींची कार्यपद्धती.**

५. (१) केंद्रीय परिषद जेव्हा जेव्हा आवश्यकता असेल त्याप्रमाणे बैठक भरवील, परंतु प्रत्येक वर्षी परिषदेच्या कमीत कमी तीन बैठकी भरवण्यात येतील.

(२) अध्यक्षाला योग्य वाटेल अशा वेळी आणि ठिकाणी केंद्रीय परिषदेची बैठक भरवण्यात येईल; आणि आपल्या कामकाज चालनाच्या संबंधात ती विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीचे पालन करील.

**केंद्रीय परिषदेची उद्दिष्टे.**

६. उपभोक्त्यांच्या खालील अधिकारांचे प्रवर्धन व संरक्षण करणे ही केंद्रीय परिषदेची उद्दिष्टे असतील ते अधिकार असे:—

(क) जीविताला व मालमत्तेला धोकादायक असेल अशा मालाच्या खरेदी विक्रीविरुद्ध संरक्षण मिळण्याचा अधिकार;

(ख) अनुचित व्यापार प्रथांपासून उपभोक्त्याचे संरक्षण व्हावे यासाठी मालाचा दर्जा, परिमाण, शक्ती, शुद्धता, मानक आणि किंमत याबद्दल माहिती मिळण्याचा अधिकार;

(ग) जेथे जेथे शक्य असेल तेथे तेथे स्पर्धात्मक किंमतींना, विविध प्रकारचा माल उपलब्ध होण्यासाठी संपर्क निश्चितपणे प्राप्त होण्याचा अधिकार;

(घ) समुचित फोरममध्ये सुनावणीचा आणि उपभोक्त्यांच्या हितसंबंधांचा योग्य विचार केला जाईल असे निश्चित आश्वासन मिळण्याचा अधिकार;

(ङ) अनुचित व्यापार प्रथा किंवा उपभोक्त्याचे अनैतिकपणे होणारे शोषण यांचे निवारण करून मागण्याचा अधिकार; आणि

(च) उपभोक्ता शिक्षणाचा अधिकार.

**राज्य उपभोक्ता संरक्षण परिषदा.**

७. (१) राज्य शासनाला, अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत ते विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून ········· साठी उपभोक्ता संरक्षण परिषद म्हणून ओळखली जाणारी एक परिषद (यात यापुढे राज्य परिषद म्हणून निर्देशित) स्थापन करता येईल.

(२) राज्य परिषदेमध्ये राज्य शासनाकडून अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या संख्येत सदस्य असतील.

राज्य परिषदेची उद्दिष्टे. ८. उपभोक्त्यांच्या, कलम ६ च्या खंड (क) ते (च) मध्ये घालून दिलेल्या अधिकारांचे राज्यामध्ये प्रवर्धन व संरक्षण करणे ही प्रत्येक राज्य परिषदेची उद्दिष्टे असतील.

## प्रकरण तीन

### उपभोक्ता विवाद निवारण अभिकरणे

उपभोक्ता विवाद निवारण अभिकरणांची स्थापना. ९. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, खालील अभिकरणांची स्थापना करण्यात येईल, ती अशी :—

(क) केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने, राज्य शासनाकडून, राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात अधिसूचनेद्वारे स्थापन करण्यात आलेला "जिल्हा फोरम" म्हणून ओळखला जाणारा उपभोक्ता विवाद निवारण फोरम.

(ख) केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने, राज्य शासनाकडून राज्यामध्ये अधिसूचनेद्वारे स्थापन करण्यात आलेला "राज्य आयोग" म्हणून ओळखला जाणारा उपभोक्ता विवाद निवारण आयोग; आणि

(ग) केंद्र शासनाकडून अधिसूचनेद्वारे स्थापन करण्यात आलेला "राष्ट्रीय उपभोक्ता विवाद निवारण आयोग".

जिल्हा फोरमची घडण. १०. (१) प्रत्येक जिल्हा फोरममध्ये खालील व्यक्तींचा समावेश असेल :—

(क) जी जिल्हा न्यायाधीश आहे किंवा होऊन गेली आहे किंवा होण्यास अर्ह आहे अशी व्यक्ती, ही राज्य शासनाकडून फोरमची अध्यक्ष होण्यासाठी नामनिर्देशित केली जाईल;

(ख) शिक्षण, व्यापार किंवा वाणिज्य या क्षेत्रातील एखादी विख्यात व्यक्ती;

(ग) एखादी सामाजिक कार्यकर्ती.

(२) जिल्हा फोरमचा प्रत्येक सदस्य पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत किंवा वयाच्या ६५ वर्षांपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पद धारण करील, व तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, राज्य शासनाला संबोधून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे एखाद्या सदस्याला आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा स्वीकारल्यानंतर त्याचे पद रिक्त होईल आणि राजीनामा दिलेल्या सदस्याच्या प्रवर्गाच्या संबंधात पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणतीही अर्हता धारण करणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या नियुक्तीद्वारे ते भरता येईल.

(३) जिल्हा फोरमच्या सदस्यांना देय असलेले वेतन किंवा मानधन आणि इतर भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील अशा असतील.

जिल्हा फोरमची अधिकारिता. ११. (१) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने, जिल्हा फोरमला, मालाचे किंवा सेवांचे आणि कोणत्याही नुकसानभरपाईचा दावा करण्यात आला असल्यास त्याचे मूल्य, एक लाख रुपयांहून कमी असेल तर, फिर्याद विचारार्थ स्वीकारण्याची अधिकारिता असेल.

(२) ज्याच्या स्थानिक सीमांच्या अधिकारितेमध्ये—

(क) फिर्याद दाखल करतेवेळी, विरुद्ध पक्षकार किंवा जेथे एकापेक्षा अधिक पक्षकार असतील तेथे त्यांच्यापैकी प्रत्येक पक्षकार प्रत्यक्षात व स्वेच्छेने राहत असेल किंवा धंदा चालवत असेल, कमाईसाठी व्यक्तिशः काम करीत असेल त्या;

(ख) एकापेक्षा अधिक विरुद्ध पक्षकार असतील तेथे त्यांच्यापैकी कोणताही विरुद्ध पक्षकार, फिर्याद दाखल करतेवेळी, जेथे प्रत्यक्षात आणि स्वेच्छेने राहत असेल किंवा धंदा चालवत असेल किंवा कमाईसाठी व्यक्तिशः काम करत असेल त्या, परंतु अशा प्रकरणी, एकतर त्या जिल्हा फोरमची परवानगी दिली जाते किंवा जे तेथे राहत नाही किंवा धंदा चालवीत नाहीत किंवा, प्रकरणपरत्वे, कमाईसाठी व्यक्तिशः काम करत नाहीत असे विरुद्ध पक्षकार अशा प्रकारे फिर्याद संस्थित करण्यास मूकसंमती देतील; किंवा

(ग) वादकारण जेथे पूर्णतः किंवा अंशतः उद्भवले असेल त्या, जिल्हा फोरममध्ये फिर्याद संस्थित करण्यात येईल.

फिर्याद करावयाची रीत. १२. विकलेला किंवा पोचवलेला माल अथवा तरतूद केलेली कोणतीही सेवा यांच्या बाबतीत जिल्हा फोरमकडे खालील व्यक्तींकडून फिर्याद दाखल केली जाऊ शकेल :—

(क) असा माल ज्याला विकण्यात किंवा पोचवण्यात आला आहे किंवा ज्याच्यासाठी अशा सेवेची तरतूद करण्यात आली असेल त्या उपभोक्त्याकडून;

(ख) कोणत्याही मान्यताप्राप्त उपभोक्ता अधिसंघाकडून—मग ज्याला माल विकण्यात वा पोचवण्यात आला आहे अथवा ज्याच्यासाठी सेवेची तरतूद करण्यात आली आहे तो उपभोक्ता अशा अधिसंघाचा सदस्य असो वा नसो—; किंवा

(ग) केंद्र किंवा राज्य शासनाकडून.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "मान्यताप्राप्त उपभोक्ता अधिसंघ" याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा याखाली नोंदण्यात आलेला कोणताही स्वयंसेवी उपभोक्ता अधिसंघ, असा आहे.

१३. (१) जिल्हा फोरम, फिर्याद मिळाल्यावर, ती कोणत्याही मालासंबंधीची असल्यास,— फिर्याद मिळाल्यानंतरची कार्यपद्धती.

(क) फिर्यादीत उल्लेखिलेल्या विरुद्ध पक्षकाराला फिर्यादीची प्रत पाठवील त्याबरोबरच त्या प्रकरणाबद्दलचे त्याचे म्हणणे तीस दिवसांच्या किंवा जिल्हा फोरमकडून मंजूर करण्यात येईल अशा जास्तीत जास्त पंधरा दिवसांच्या विस्तारित कालावधीच्या आत मांडण्याचे निदेश देईल.

(ख) खंड (क) अन्वये विरुद्ध पक्षकाराकडे पाठवलेली फिर्याद त्यास मिळाल्यानंतर जेथे तो फिर्यादीत अंतर्भूत असलेली अभिकथन नाकारील वा त्याबद्दल विवाद करील अथवा जिल्हा फोरमकडून देण्यात आलेल्या कालावधीच्या आत आपले म्हणणे मांडण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्याचे वगळील किंवा त्याबाबत कसूर करील तेथे, जिल्हा फोरम, खंड (ग) ते (छ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने उपभोक्ता विवाद मिटवण्याची कार्यवाही सुरू करील;

(ग) जेव्हा फिर्यादीत अभिकथित केलेल्या मालातील दोष त्या मालाचे योग्य विश्लेषण किंवा चाचणी केल्याशिवाय निश्चित करता येणे शक्य नसेल, तेव्हा जिल्हा फोरम फिर्यादीकडून मालाचा नमुना मिळवील, तो मोहोरबंद करून विहित रीतीने प्राधिकृत करील आणि अशा प्रकारे मोहोरबंद करण्यात आलेला नमुना समुचित प्रयोगशाळेकडे अशा निदेशासह पाठवील की, अशा प्रयोगशाळेने अशा मालात फिर्यादीमध्ये अभिकथित केलेला कोणताही दोष आहे किंवा कसे किंवा त्यामध्ये इतर कोणताही दोष आहे किंवा कसे याचा शोध घेण्याच्या दृष्टीने, आवश्यक असेल त्याप्रमाणे विश्लेषण किंवा चाचणी करावी व निदेश मिळाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत किंवा जिल्हा फोरमकडून मंजूर करण्यात येईल अशा विस्तारित कालावधीच्या आत त्यावरील आपले निष्कर्ष जिल्हा फोरमला अहवालाद्वारे कळवावे;

(घ) खंड (ग) अन्वये मालाचा कोणताही नमुना कोणत्याही समुचित प्रयोगशाळेकडे पाठवण्यापूर्वी प्रश्नास्पद मालाच्या संबंधात आवश्यक ते विश्लेषण किंवा चाचणी करण्याकरिता समुचित प्रयोगशाळेला प्रदान करण्यासाठी, जिल्हा फोरम फिर्यादीला जिल्हा फोरमच्या जमा खाती विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी फी जमा करण्यास फर्मावू शकेल;

(ङ) समुचित प्रयोगशाळेला खंड (ग) मध्ये उल्लेख केलेले विश्लेषण किंवा चाचणी करणे शक्य व्हावे यासाठी, जिल्हा फोरम खंड (घ) अन्वये त्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली रक्कम समुचित प्रयोगशाळेकडे प्रेषित करील, व समुचित प्रयोगशाळेकडून अहवाल मिळाल्यानंतर, जिल्हा फोरम त्याची एक प्रत त्यास समुचित वाटतील अशा शेऱ्यांसह विरुद्ध पक्षकाराला अग्रेषित करील;

(च) जर पक्षकारांपैकी कोणीही, समुचित प्रयोगशाळेच्या निष्कर्षांच्या अचूकतेविषयी विवाद करील, किंवा समुचित प्रयोगशाळेने अंगीकारलेल्या विश्लेषणाच्या किंवा चाचणीच्या पद्धतीच्या अचूकतेविषयी विवाद करील तर, जिल्हा फोरम विरुद्ध पक्षकाराला किंवा फिर्यादीला, समुचित प्रयोगशाळेने दिलेल्या अहवालाच्या बाबतीतील त्यांचे आक्षेप लेखी सादर करण्यास फर्मावील;

(छ) त्यानंतर जिल्हा फोरम समुचित प्रयोगशाळेने दिलेला अहवाल अचूक आहे की अन्यथा आहे याबाबत तसेच त्यावर खंड (च) अन्वये घेण्यात आलेल्या आक्षेपांबाबतसुद्धा फिर्यादीला तसेच विरुद्ध पक्षकारालाही सुनावणीची वाजवी संधी देईल आणि कलम १४ अन्वये त्याबाबत समुचित आदेश काढील.

(२) जर कलम १२ अन्वये त्यात मिळालेली फिर्याद ही अशा मालाच्या संबंधात असेल की, त्याच्या बाबतीत पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरता येत नाही, किंवा फिर्याद कोणत्याही सेवांशी संबंधित असेल तर, जिल्हा फोरम त्या बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करील :—

(क) अशा फिर्यादीची एक प्रत विरुद्ध पक्षकाराला पाठवील त्याबरोबरच त्या प्रकरणाबद्दलचे त्याचे म्हणणे तीस दिवसांच्या आत किंवा जिल्हा फोरमकडून मंजूर करण्यात येईल अशा जास्तीत जास्त पंधरा दिवसांच्या विस्तारित कालावधीच्या आत मांडण्याचे निदेश देईल.

(ख) खंड (क) अन्वये विरुद्ध पक्षकाराकडे पाठवण्यात आलेली फिर्यादीची प्रत त्यास मिळाल्यानंतर जेथे तो, फिर्यादीत अंतर्भूत असलेली अभिकथने नाकारील किंवा त्याबाबत विवाद करील अथवा जिल्हा फोरमकडून देण्यात आलेल्या कालावधीच्या आत आपले म्हणणे मांडण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्याचे वगळील किंवा त्याबाबत कसूर करील तेथे जिल्हा फोरम :—

(एक) जेथे विरुद्ध पक्षकार फिर्यादीत अंतर्भूत असलेली अभिकथने नाकारीत असेल किंवा त्याबाबत विवाद करीत असेल तेथे फिर्यादीने, तक्रारकर्त्याने व विरुद्ध पक्षकाराने त्याच्या निदर्शनास आणून दिलेल्या पुराव्याच्या आधारे; किंवा

(दोन) जेथे फोरमने दिलेल्या कालावधीच्या आत आपले म्हणणे मांडण्याबाबत विरुद्ध पक्षकार कोणतीही कार्यवाही करण्याचे वगळील किंवा त्याबाबत कसूर करील तेथे, फिर्यादीने त्याच्या निदर्शनास आणून दिलेल्या पुराव्याच्या आधारे,

तो उपभोक्ता विवाद मिटवण्याची कार्यवाही सुरू करील.

(३) पोटकलमे (१) व (२) मध्ये घालून देण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन करणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीला, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे अनुपालन करण्यात आलेले नाही, या कारणाने कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करण्यात येणार नाही.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ, जिल्हा फोरमला पुढील बाबींच्या संबंधात, एखाद्या दाव्याची संपरीक्षा करताना "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" (१९०८ चा ५) याखाली दिवाणी न्यायालयांकडे ज्या शक्ती निहित करण्यात आल्या आहेत त्याच शक्ती असतील. त्या बाबी अशा :—

(एक) कोणत्याही प्रतिवादीस किंवा साक्षीदारास समन्स पाठवणे व त्याला हजर राहावयास भाग पाडणे आणि त्या साक्षीदाराची शपथेवर तपासणी करणे;

(दोन) पुरावा म्हणून दाखल करण्याजोगा असेल असा कोणताही दस्तऐवज किंवा इतर सामग्री शोधणे व दाखल करणे;

(तीन) प्रतिज्ञालेखांवर पुरावा स्वीकारणे;

(चार) समुचित प्रयोगशाळेकडून किंवा इतर कोणत्याही सुसंगत साधनांकडून संबंधित विश्लेषणाच्या किंवा चाचणीच्या अहवालाची रीतसर मागणी करणे;

(पाच) कोणत्याही साक्षीदाराच्या तपासणीसाठी कोणतेही आयोगपत्र काढणे; आणि

(सहा) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(५) जिल्हा फोरम समोरील प्रत्येक कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम १९३ व २२८ च्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल, आणि कलम १९५ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) हिचे प्रकरण सव्वीस यांच्या प्रयोजनार्थ, जिल्हा फोरम, हे एक दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

जिल्हा फोरमचे निष्कर्ष. १४. (१) कलम १३ अन्वये कार्यवाही चालवल्यानंतर, जर ज्याविरुद्ध फिर्याद करण्यात आली आहे त्या मालात, फिर्यादीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कोणताही दोष, आहे किंवा सेवांच्या बाबतीत फिर्यादीमध्ये अंतर्भूत असलेल्या अभिकथनांपैकी कोणतेही अभिकथन सिद्ध झाले आहे, याबद्दल जिल्हा फोरमचे समाधान झाले असेल तर, ते विरुद्ध पक्षकाराला खालीलपैकी एक किंवा अधिक गोष्टी करण्याचा निदेश देणारा आदेश देईल त्या गोष्टी अशा :—

(क) प्रश्नास्पद मालामध्ये समुचित प्रयोगशाळेने दाखवून दिलेला दोष दूर करणे ;

(ख) अशा मालाच्या ऐवजी त्या सारख्याच वर्णनाचा ज्यात कोणताही दोष नाही असा नवीन माल पुन:स्थापित करणे ;

(ग) फिर्यादीने दिलेली किंमत किंवा दिलेला आकार त्यास परत करणे ;

(घ) विरुद्ध पक्षकाराच्या हलगर्जीपणामुळे उपभोक्त्यास झालेला तोटा किंवा पोहचलेली क्षती यांसाठी भरपाई म्हणून, जिल्हा फोरम उपभोक्त्याला निवाडयाद्वारे देईल इतकी रक्कम देणे.

[1][ (२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली प्रत्येक कार्यवाही, जिल्हा फोरमच्या अध्यक्षाकडून आणि त्याच्या बरोबर फोरमच्या निदान एका सदस्याच्या उपस्थितीत चालवण्यात येईल :

परंतु, ज्याबाबतीत, तो सदस्य कोणत्याही कारणाने कार्यवाही पूर्ण होईपर्यंत, ती चालवण्यास असमर्थ असेल त्या बाबतीत अध्यक्ष आणि इतर सदस्य नव्याने अशी कार्यवाही करतील.

(२क) जिल्हा फोरमकडून पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेल्या प्रत्येक आदेशावर अध्यक्षाची व ज्यांनी कार्यवाही चालवली असेल अशा सदस्याची किंवा सदस्यांची सही असेल :

परंतु, जेव्हा अध्यक्षाकडून किंवा एका सदस्याकडून कार्यवाही चालवण्यात आली असेल आणि त्यांच्यामध्ये कोणत्याही एका किंवा अनेक मुद्यांवर मतभेद असतील तेव्हा, ते, ज्यावर त्यांच्यात मतभेद आहे असे एक किंवा अनेक मुद्दे नमूद करतील आणि असे एक किंवा अनेक मुद्दे इतर सदस्यांकडे सुनावणीसाठी निर्देशित करतील आणि बहुसंख्य सदस्यांचे जे मत असेल त्याप्रमाणे जिल्हा फोरमचा आदेश असेल. ]

(३) पूर्वगामी उपबंधाच्या अधीनतेने, जिल्हा फोरमच्या सभा, बैठकी व इतर बाबी चालवण्याच्या संबंधातील कार्यपद्धती, राज्य शासन, विहित करील त्याप्रमाणे राहील.

अपिले. १५. जिल्हा फोरमने दिलेल्या एखाद्या आदेशाने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, अशा आदेशाविरुद्ध राज्य आयोगाकडे अपील करू शकेल :

परंतु, जर त्या कालावधीच्या आत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते त्याबाबत राज्य आयोगाचे समाधान झाले असेल तर, तीस दिवसांच्या उक्त कालावधीच्या समाप्तीनंतरही राज्य आयोग अपील विचारार्थ स्वीकारू शकेल.

---

१. सन १९९१ चा अधिनियम, याच्या कलम २ अन्वये मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मधील पोटकलम (२) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात आला (१६ ऑगस्ट, १९९१ रोजी व तेव्हापासून).

१६. (१) प्रत्येक राज्य आयोगात खालील व्यक्तींचा समावेश असेल,— राज्य आयोगाची घडण.

(क) जी एखाद्या उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा होऊन गेली आहे अशी राज्य शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती, ही त्याची अध्यक्ष असेल;

(ख) ज्यांच्या ठायी कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा आहे व ज्यांना अर्थशास्त्र, कायदा, वाणिज्य, लेखाशास्त्र, उद्योग, सार्वजनिक कारभार किंवा प्रशासन यासंबंधीच्या समस्यांचे पर्याप्त ज्ञान किंवा अनुभव आहे किंवा ज्यांनी त्यासंबंधी कार्यवाही करताना विशेष क्षमता दाखवली आहे असे इतर दोन सदस्य; त्यातील एक स्त्री असेल :

परंतु, एखाद्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा विचार घेतल्याखेरीज, या पोटकलमान्वये कोणत्याही विद्यमान न्यायाधीशाची नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) राज्य आयोगाच्या सदस्यांना देय असलेले वेतन किंवा मानधन व सेवेच्या इतर अटी व शर्ती (पदावधीसह) राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे असतील.

१७. या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने, राज्य आयोगास खालील गोष्टी करण्याची अधिकारिता असेल :— राज्य आयोगाची अधिकारिता.

(क) खालील बाबी विचारार्थ स्वीकारणे,—

(एक) ज्यांतील मालाचे किंवा सेवांचे आणि कोणत्याही भरपाईचा दावा केला असल्यास तिचे मूल्य एक लाख रुपयांपेक्षा जास्त असेल परंतु दहा लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा फिर्यादी; आणि

(दोन) राज्यांतर्गत कोणत्याही जिल्हा फोरमच्या आदेशाच्या विरुद्धची अपिले; आणि

(ख) राज्यांतर्गत कोणत्याही जिल्हा फोरमसमोर प्रलंबित असलेल्या किंवा जेथे राज्य आयोगाला असे वाटेल की, जिल्हा फोरमने कायद्याने त्याच्या ठायी निहित न केलेल्या अधिकारितेचा वापर केलेला आहे, किंवा त्याच्या ठायी अशा प्रकारे निहित केलेल्या अधिकारितेचा वापर करण्यात कसूर केली आहे किंवा आपल्या अधिकारितेचा वापर करताना अवैध किंवा महत्त्वाची नियमबाह्यता असलेली कार्यवाही केली आहे तेथे, त्याने निर्णय दिलेल्या कोणत्याही उपभोक्ता विवादात अभिलेख मागवणे आणि समुचित आदेश देणे.

१८. जिल्हा फोरमद्वारे फिर्यादी निकालात काढल्या जाण्यासाठी कलमे १२, १३ आणि १४ व त्याखाली केलेले नियम यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती आवश्यक असतील अशा आपरिवर्तनांसह, राज्य आयोगाद्वारे विवाद निकालात काढले जाण्यास लागू असेल. राज्य आयोगांना लागू असलेली कार्यपद्धती.

[1]["१८क. जेव्हा जिल्हा फोरम किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य आयोगाच्या अध्यक्षाचे पद रिक्त असेल किंवा जेव्हा कोणताही असा अध्यक्ष, अनुपस्थितीमुळे किंवा अन्य कारणांमुळे, त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तेव्हा, या प्रयोजनाकरिता जिल्हा फोरमची किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य आयोगाची अध्यक्ष म्हणून नेमणूक होण्यास जी अर्हताप्राप्त आहे अशी राज्यशासन नियुक्ती करू शकेल ती व्यक्ती त्या पदाची कर्तव्ये पार पाडील."]. अध्यक्षांच्या पदाची रिक्तता.

१९. कलम १७ च्या खंड (क) च्या उपखंड (एक) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून राज्य आयोगाने दिलेल्या एखाद्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा आदेशाविरुद्ध आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित करण्यात येईल अशा प्रपत्रात व रीतीने राष्ट्रीय आयोगाकडे अपील करू शकेल : अपिले.

परंतु, त्या कालावधीच्या आत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबद्दल राष्ट्रीय आयोगाचे समाधान झाले असेल तर तीस दिवसांच्या उक्त कालावधीच्या समाप्तीनंतरही राष्ट्रीय आयोग अपील विचारार्थ स्वीकारू शकेल.

२०. (१) राष्ट्रीय आयोगामध्ये खालील व्यक्तींचा समावेश असेल,— राष्ट्रीय आयोगाची घडण.

(क) जी सर्वोच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा होऊन गेली आहे अशी केंद्र शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती, ही त्याची अध्यक्ष असेल;

(ख) ज्यांच्या ठायी कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा आहे व ज्यांना अर्थशास्त्र, कायदा, वाणिज्य, लेखाशास्त्र, उद्योग, सार्वजनिक कारभार किंवा प्रशासन या संबंधीच्या समस्यांचे पर्याप्त ज्ञान किंवा अनुभव आहे किंवा ज्यांनी त्यासंबंधी कार्यवाही करताना विशेष क्षमता दाखवली आहे असे इतर चार सदस्य, त्यातील एक स्त्री असेल :

परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा विचार घेतल्याखेरीज, या पोटकलमान्वये कोणत्याही विद्यमान न्यायाधीशाची नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) राष्ट्रीय आयोगाच्या सदस्यांना देय असलेले वेतन किंवा मानधन व सेवेच्या इतर अटी व शर्ती (पदावधीसह) केंद्र शासन विहित करील त्याप्रमाणे असतील.

---

१. सन १९९१ चा अधिनियम, याच्या कलम ३ अन्वये मुख्य अधिनियमाच्या कलम १८ नंतर नवीन कलम १८क दाखल करण्यात आले (१६ ऑगस्ट, १९९१ रोजी व तेव्हापासून).

**राष्ट्रीय आयोगाची अधिकारिता.** २१. या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने राष्ट्रीय आयोगास खालील गोष्टी करण्याची अधिकारिता असेल,—

(क) खालील बाबी विचारार्थ स्वीकारणे,—

(एक) ज्यांतील मालाचे किंवा सेवांचे आणि कोणत्याही भरपाईचा दावा केला असल्यास तिचे मूल्य, दहा लाख रुपयांपेक्षा जास्त आहे अशा फिर्यादी ; आणि

(दोन) कोणत्याही राज्य आयोगाच्या आदेशाविरुद्धची अपिले ; आणि

(ख) कोणत्याही राज्य आयोगासमोर प्रलंबित असलेल्या किंवा जेथे राष्ट्रीय आयोगाला असे वाटेल की, राज्य आयोगाने, कायद्याने त्याच्या ठायी निहित न केलेल्या अधिकारितेचा वापर केला आहे, किंवा त्याच्या ठायी अशा प्रकारे निहित केलेल्या अधिकारितेचा वापर करण्यांत कसूर केली आहे, किंवा आपल्या अधिकारितेचा वापर करताना, अवैध किंवा महत्त्वाची नियमबाह्यता असलेली कार्यवाही केली आहे, तेथे त्याने निर्णय दिलेल्या कोणत्याही उपभोक्ता विविदात अभिलेख मागवणे आणि समुचित आदेश देणे.

**राष्ट्रीय आयोगाला लागू असलेली कार्यपद्धती.** २२. राष्ट्रीय आयोगाला, स्वतः पुढील कोणत्याही फिर्यादी किंवा कार्यवाह्या निकालात काढताना, कलम १३ ची पोटकलमे (४) व (५) यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असतील व तो, केंद्र शासन विहित करील अशी कार्यपद्धती अनुसरील.

**अपिले.** २३. राष्ट्रीय आयोगाने कलम २१ च्या खंड (क) च्या उप-खंड (एक) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्ती वापरून दिलेल्या एखाद्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा आदेशाविरुद्ध, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करू शकेल :

परंतु, त्या कालावधीच्या आत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे समाधान झाले असेल तर, सर्वोच्च न्यायालय तीस दिवसांच्या उक्त कालावधीच्या समाप्तीनंतरही अपील विचारार्थ स्वीकारू शकेल.

**आदेशांची अंतिमता.** २४. जिल्हा फोरमचा, राज्य आयोगाचा किंवा राष्ट्रीय आयोगाचा प्रत्येक आदेश हा, या अधिनियमाच्या उपबंधान्वये अशा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील करण्यात आले नसेल तर, अंतिम असेल.

**फोरम, राज्य आयोग किंवा राष्ट्रीय आयोग यांच्याकडून आदेशांची बजावणी.** २५. जिल्हा फोरमने, राज्य आयोगाने किंवा राष्ट्रीय आयोगाने दिलेल्या प्रत्येक आदेशाची बजावणी जिल्हा फोरमकडून, राज्य आयोगाकडून किंवा, प्रकरणपरत्वे, राष्ट्रीय आयोगाकडून, जणू काय तो एखाद्या न्यायालयाने त्याच्याकडे प्रलंबित असलेल्या दाव्यामध्ये दिलेला हुकूमनामा किंवा आदेश असावा त्याप्रमाणे करण्यात येईल आणि ते त्या आदेशाचे निष्पादन करण्यास असमर्थ असल्यास, जिल्हा फोरमने, राज्य आयोगाने, किंवा राष्ट्रीय आयोगाने असा आदेश,

(क) आदेश एखाद्या कंपनीविरुद्ध असेल त्या बाबतीत कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय ; किंवा

(ख) आदेश इतर कोणत्याही व्यक्तीविरुद्ध असेल त्याबाबतीत, संबंधित व्यक्ती जेथे स्वेच्छेने राहते किंवा धंदा चालवते किंवा कमाईसाठी वैयक्तिकरीत्या काम करते असे ठिकाण,

ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये स्थित आहे अशा न्यायालयाकडे पाठवणे कायदेशीर ठरेल आणि त्यानंतर, असा आदेश ज्याच्याकडे अशा रीतीने पाठवण्यात आलेला आहे ते न्यायालय जणू काही तो आदेश म्हणजे त्याच्याकडे निष्पादनासाठी पाठवण्यात आलेला हुकूमनामा किंवा आदेश असावा त्याप्रमाणे त्याचे निष्पादन करील.

**क्षुल्लक किंवा त्रासदायक फिर्यादी खारीज करणे.** २६. दाखल करण्यात आलेली फिर्याद जेथे क्षुल्लक किंवा त्रासदायक आहे असे दिसून येईल तेथे, जिल्हा फोरम, राज्य आयोग किंवा, प्रकरणपरत्वे, राष्ट्रीय आयोग ती फिर्याद खारीज करू शकेल.

**शास्ती.** २७. जेथे ज्याच्या विरुद्ध फिर्याद करण्यात आली आहे, तो व्यापारी किंवा ती व्यक्ती, जिल्हा, फोरमच्या, राज्य आयोगाच्या किंवा, प्रकरणपरत्वे, राष्ट्रीय आयोगाच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर करील किंवा ते करण्याचे वगळील तर, अशा व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस कमीत कमी एक महिना मुदतीची परंतु जी तीन वर्षांपर्यंत वाढविता येईल अशा मुदतीच्या कारावासाची किंवा कमीत कमी दोन हजार रुपये इतक्या, परंतु जो दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा, किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील :

परंतु, कोणत्याही प्रकरणाच्या परिस्थितीनुसार तसे करणे आवश्यक आहे याबद्दल जिल्हा फोरमचे, राज्य आयोगाचे किंवा ,प्रकरणपरत्वे, राष्ट्रीय आयोगाचे समाधान झाले असेल तर, त्यास या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान मुदतीपेक्षा कमी मुदतीच्या कारावासाचा किंवा विनिर्दिष्ट केलेल्या किमान रकमेपेक्षा कमी रकमेच्या द्रव्यदंडाचा किंवा या दोन्हींचा शिक्षादेश लादता येईल.

## प्रकरण चार

### संकीर्ण

२८. जिल्हा फोरमच्या, राज्य आयोगाच्या किंवा राष्ट्रीय आयोगाच्या सदस्यांविरुद्ध, किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे निष्पादन करताना जिल्हा फोरमच्या, राज्य आयोगाच्या किंवा राष्ट्रीय आयोगाच्या निदेशानुसार कार्य करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध किंवा या अधिनियमाखाली किंवा तद्न्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा आदेश यानुसार अशा सदस्यांकडून, अधिकाऱ्यांकडून किंवा व्यक्तींकडून सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

२९. (१) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यामध्ये जर कोणतीही अडचण उद्भवली, तर केंद्र शासनास, ती अडचण दूर करण्यासाठी, त्याला आवश्यक किंवा समयोचित वाटतील, ते या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील, असे उपबंध, **शासकीय राजपत्रातील** आदेशाद्वारे करता येतील : अडचणी दूर करण्याची शक्ती.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमाअन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

[1][२९क. जिल्हा फोरमची, राज्य आयोगाची किंवा राष्ट्रीय आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, त्याच्या सदस्यांमधील केवळ अस्तित्वात असलेल्या रिक्त पदाच्या कारणामुळे किंवा जिल्हा फोरमच्या रचनेतील कोणत्याही दोषामुळे विधिग्राह्य ठरणार नाही.] नियुक्तीतील रिक्तता किंवा दोष यामुळे आदेश विधिग्राह्य न ठरणे.

३०. (१) केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोटकलम (२) चा खंड (ख), कलम ५ चे पोटकलम (२), कलम १३ च्या पोटकलम (४) चा खंड (सहा), कलम १९, कलम २० चे पोटकलम (२) आणि कलम २२, यांमध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांचे पालन करण्यासाठी नियम करू शकेल. नियम करण्याची शक्ती.

(२) राज्य शासन, अधिसूचनेद्वारे कलम १० चे पोटकलम (३), कलम १३ च्या पोटकलम (१) चा खंड (ग), कलम १४ चे पोटकलम (३), कलम १५ आणि कलम १६ चे पोटकलम (२) यांमध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांचे पालन करण्यासाठी नियम करू शकेल.

३१. (१) केंद्र शासनाने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर त्यानंतर, ते नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाहीत, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही. नियम मांडणे.

(२) राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळापुढे ठेवला जाईल.

---

१. सन १९९१ चा अधिनियम, याच्या कलम ४ अन्वये मुख्य अधिनियमाच्या कलम २९ नंतर नवीन कलम २९ क हे दाखल करण्यात आले (१६ ऑगस्ट १९९१ रोजी व तेव्हापासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई